महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५,  मुंबई, दि. २०/०८/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक- सीसीटी ०८२५/ प्र. क्र. ३९/ई-१०३०३५६/ पोल-३ , दि.१४/०८/२०२५.

**विषय :-** पुणे शहरासाठी इंटिलिजन्स ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (ITMS) करिता नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे मानधनाच्या अनुषंगाने आवश्यक निधीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक- सीसीटी०८२५/ प्र. क्र. ३९/ई-१०३०३५६ / पोल-३, दि.१४/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८१४१५५८४४९६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, पुणे.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पुणे शहरासाठी इंटिलिजन्स ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (ITMS) करिता नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे मानधनाच्या अनुषंगाने आवश्यक निधीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी०८२५/प्र.क्र.३९/ई-१०३०३५६/पोल-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४.८.२०२५

**वाचा :-**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुबंई यांचे दि.२७.१२.२०२४,दि.२०.१.२०२५, दि.४.४.२०२५, दि.३०.६.२०२५ रोजीचे पत्र

२) उच्च शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१०.३.२०२५ व दि.२१.४.२०२५ रोजीच्या बैठकांचे इतिवृत्त

३) पोलीस आयुक्त, पुणे यांची दि.३१.१२.२०२४, दि.१०.१.२०२५, दि.३०.५.२०२५ रोजीची पोलीस महासंचालक कार्यालयास सादर झालेली पत्रे.

४) गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्रक्र६४/विशा-३ अ, दि.२२.३.२०१७.

५) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमव्हीआर ०७१६/प्रक्र३२४/परि-२, दि.१.९.२०१६.

६) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमव्हीआर १०२३/प्रक्र२०१/परि-२, दि.३.६.२०२५.

७) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमव्हीआर ०१२४/प्रक्र०५/परि-२, दि.१०.६.२०२५.

८) माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय No. GAD IT ०८०/४/२०१४-०/०, Directorate of IT-DIT (MH) Dt. ५.१०.२०२३.

९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५.

**प्रस्तावना:-**

पुणे शहराअंतर्गत कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी तसेच वाहतूक व्यवस्थेचे सुनियोजन ही पोलीस विभागाची जबाबदारी असल्याने त्यादृष्टीने पोलीस आयुक्तालय, पुणे यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ITMS (Inelegance Traffic Management System) ही प्रणाली राबविणेबाबत प्रस्तावित केले आहे. या प्रणालीमध्ये सर्व जंक्शन्स व त्यावरील सिग्नलच्या वेळा, वाहतूकीच्या दृष्टीने वाहनांचे संख्येवर आधारीत विविध जंक्शनअंतर्गत रस्ते, मुख्य रस्ते, रडार आधारीत प्रणाली, लेझर आधारीत प्रणाली, कॅमेरा (सीसीटीव्ही) आधारीत प्रणाली यांची उभारणी तथा अंमलबजावणी यांचा समावेश असेल

असे नमूद केलेला प्रस्ताव पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दिनांक ३१.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे शासनास सादर केला.

इंटिलिजन्ट ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) साठी सूचक उपाय ठळक करणारे विविध घटक म्हणजे नागरीक केंद्रीत प्लॅटफॉर्म, स्वयंचलीत रहदारी मोजणी वर्गीकरण, व्हेरीयेबल मेसेज डिस्प्ले/व्ही.एम.डी. बोर्ड, नागरीक तक्रार निवारण प्लॅटफॉर्म, कम्युटेबल ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम, विविध स्तरावरील मॉनेटरींग ऑपरेशन्स, डॅशबोर्ड डिझाईन आणि विकसन, शहर पायाभूत सुविधा व्यवस्थापन इत्यादी बाबी लक्षात घेता इंटीलिजन्ट ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) च्या संकल्पना, रचना आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करुन अंमलबजावणीसाठी पुणे पोलीस आयुक्तालयास तांत्रिक सल्लागार यांची आवश्यकता आहे. व्यवस्थापन सल्लागाराच्या कामकाजाची सूचक व्याप्ती सादरीकरणातील परिशिष्ट अन्वये सादर करण्यात आली, व पुणे शहरांतर्गत इंटिलिजन्स ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) प्रकल्पाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करण्याची विनंती पोलीस आयुक्त, पुणे यांनी दिनांक ३१.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे केली होती.

पुणे शहरासाठी इंटिलिजन्ट ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) हा नविन संभाव्य प्रकल्प करण्यासाठी प्रकल्पासाठीचा आराखडा अनुषंगिक खर्च, प्रकल्पाची उपयुक्तता इत्यादी बाबी विचारात घेऊन वस्तुनिष्ठ सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) करण्यासाठी सल्लागार नियुक्त करणे, संभाव्य प्रकल्प अंमलबजावणीची समिती गठीत करणे, या अनुषंगाने आवश्यक निधीची तरतूद करणे या संदर्भात अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१०.३.२०२५ रोजीच्या बैठकीत चर्चा झाली व पोलीस आयुक्त, पुणे कार्यालयाकडून सादरीकरण करण्यात आले. यास अनुलक्षून व तद्नंतर दि. २१.४.२०२५ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयास अनुलक्षून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

## शासन निर्णय-

मा.अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०४/२०२५ रोजी आयोजित उच्च शक्ती प्रदत्त समितीमध्ये पुणे शहर पोलीस आयुक्तालय स्तरावरील ITMS संबंधी PIC समितीने पाठविलेल्या इतिवृत्तास मान्यता देवुन, प्रकल्प सल्लागार M/s. Primus Partners Pvt. Ltd, Mumbai यांची निवड करून, तसेच त्यांनी सादर केलेल्या निविदेतील रकमेला जीएसटीसह रू.२,९९,१८,३१०/-(रू.दोन कोटी नव्याण्णव लाख अठरा हजार तीनशे दहा फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत १३- कार्यालयीन खर्च " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय उच्चस्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दि.१०.३.२०२५ व दि. २१.४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ.सं.५३०/२०२५/व्यय-७, दि.६.८.२०२५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०८१४१५५८४४९६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.08.14 16:00:05 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव,माहिती व तंत्रज्ञान , मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त,मुंबई.
१०.सहपोलीस आयुक्त,वाहतुक,मुंबई.
११.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय,मुंबई.
१४. व्यय ७,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. विशा-३ अ,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. अर्थ शाखा, गृह विभाग.
१७. निवड नस्ती / पोल-३.